ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# भारतातील स्त्रीवादी चळवळी ची सद्यस्थिती आणि आव्हाने

*डॉ.प्रशांत कांबळे

* S.N.D.T. College of Arts &S.C.B. College of Com. &S. C. B. for women's charchget, Mumbai.

**शोध सारांश:**

*भारतीय समाजात विविध चळवळीत स्त्रीवादी चळवळीचा हिस्सा खूप मोलाचा आहे .मानवी जीवनात चळवळीला फार महत्व आहे. म्हणून चळवळी ह्या मनुष्याच्या जीवनातील एक महत्वपूर्ण अंग आहे असे म्हन्ता येईल जेव्हा समाजातील लोकांचे शोषण होते लोकांवर अन्याय-अत्याचार होतो आहे याची जेव्हा जाणीव होते त्या-त्या वेळेस प्रतिकारार्थ लढा देणे अपरिहार्य ठरते. हे लढे वैचारिक दृष्ट्या लेखनाव्दरे, भाषणाद्वारे आणि प्रत्यक्ष लढाई करून समोरासमोर देता येतात यालाच आंदोलनत्मक लढाई किवा चळवळ असे म्हणता येईल. चळवळ हे एक सामाजिक तथ्य आहे. सामूहिक व्यवहार आहे. एक मानसशास्त्रीय तथ्यसुद्धा आहे. सामाजिक चळवळीचा संबंध प्रामुख्याने सामाजिक परिवर्तनाशी असतो. परंतु सर्व परिवर्तने सामाजिक चळवळीमुळे घडून येतात असेही नाही सम्पूर्ण समाज व्यवस्थेत किवा व्यवस्थेच्या एखाद्या अंगात परिवर्तन घडून आणण्याच्या उद्देशाने चळवळी बांध्य असतात. स्त्रीवादी चळवळी कडून अनेक आशेचे किरण आहेत.आजच्या तरुण स्त्रिया स्त्री-पुरुष समानता गृहीत धरतात स्वातंत्र्याची आस धरतात स्त्री चळवळीचा अनेक अंगांनी त्यांना फायदा झाला आहे.आज स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप जात,धर्म,प्रांत,अशा मध्ये बांधले गेले आहे. यामुळे चळवळीला गतिरोध निर्माण झाला.आणि स्त्रीवादी चळवळी पुढे मोठे आव्हान आहे असे दिसते.*

***पारिभाषिक शब्दावली-*** स्त्रीवादी चळवळ, गतिरोध, आव्हान, प्रतिकारार्थ लढा, वस्तुस्थिती

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना :**

समाजात होणारे अन्याय ,अत्याचार ,वंचीतता हि चळवळीला जन्म देते . मानवी समाजात सामाजिक, धार्मिक, आर्थीक, राजकीय, या प्रत्येक व्यक्तीला-सांस्कृतीक अशा मुल्यांना महत्व असते समाजात राहणास्वातंत्र्य हवे असते . प्रत्येकजण सुखी जीवनाची अपेक्षा करीत असतोयेतात. सर्वच व्यक्ती विशीष्ट आदर्शानी मुल्यांनी बांधल्या जातात. तेव्हा समाजातील सर्वच व्यक्तीवर विशीष्ट बंधने . ,सर्वानाच समानतेची वागनुक दिली तर समता प्रस्थापित होवुन सामाजीक, आर्थीक, राजकीय न्याय प्रस्थापित झाले तर समाजव्यवस्था स्थिर होउ शकते .जगातील कोणत्यही धर्मग्रंथाने स्त्रीला पुरुषाबरोबर स्थान आले नाही .स्वभिमान ,आत्मविश्वास यशस्वी इच्छा ,स्वावलंबन या घटकापासून ती कोसो दूर आहे .

भारताच्या संदर्भात विविधता हे देशाचे वैशिष्टये आहे. जात, पंथ ,धर्म, संप्रदाय , भाषा, ई. बाबत विविधता दिसून येते. हि विविधता एक चिंतेची बाब आहे. प्रत्येक गट आपली निष्ठा, आपला समूह, याचीच जपणूक करतो. परंतु सम्पूर्ण एकसंघ भारताचा विचारच करीत

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022
OPEN ACCESS Original Research Article

नाही. धर्मांधता, जातीय, पूर्वग्रह व भाषिक वैर , जातीय दंगली, आतंवाद, नक्षलवद्यांचा नरसंहार, दलितांवर होणारे अत्यचार, स्त्रीयावरील वाढते अत्याचार, बलात्कार व हत्या, ई. वस्तुस्थितीकडे चळवळी लक्ष वेधतात.

आधुनिक भारतीय समाजाच्या संदर्भात सामाजिक चळवळीची सुरुवात खऱ्या अर्थाने ब्रिटीशांच्या राजवटीत झाल्या. पाश्चत्य विचारसरणीची ओळख झाली शिक्षणाचा प्रसार झाला. स्वातंत्र्य, समता,बंधुत्व, व न्याय या मानवी मुल्यांची ओळख झाली अनिष्ठ धार्मिक, सामाजिक रूढी-परंपराची लोकांना जाणीव झाली यातूनच सामाजिक चळवळीचा प्रारंभ झाला.

सामाजिक चळवळ कशाला म्हणावे याविषयी समाजशास्त्रामध्ये सूद्धा मतभेद आहे तरी सूद्धा अभ्यासक ऐतिहासिक घडामोडीच्या विश्लेषणासाठी “चळवळ” हा शब्द वापरतात. सामाजिक चळवळी हा विशिष्ट तत्वप्रणालीवर विश्वास असणाऱ्या लोकांनी संघटीतरीत्या केलेला प्रयत्न आहे. आणि ज्या चळवळी लोकांमध्ये सामाजिक परिवर्तने घडवून आणतात त्यांना समाजशास्त्रीय दृष्टीने सामाजिक चळवळी असे म्हणतात.

**अध्यनाची उद्दिष्टे:**

1) वर्तमान काळातील स्त्री चळवळीचा आढावा घेणे .

2) स्त्री चळवळी पुढील आव्हाणांचा अभ्यास करणे.

**अध्यनाचे गृहीते :**

1) सामाजिक चळवळीचा संबंध प्रामुख्याने सामाजिक परिवर्तनाशी असतो.

2) कर्तृत्व सिद्धकरण्याची क्षमता आहे.

3) पितृसत्ताक पद्धतीचा प्रभाव आहे.

4) स्त्री-पुरुष असमानता आहे.

**अध्ययन संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध द्वितीय स्त्रोतावर आधारित आहे .यासठी विविध संदर्भ ग्रंथ ,लेख ,मते ,इंटरनेट या द्वितीय स्त्रोताचा उपयोग केला असून आशय विश्लेषण तंत्र वापरले आहे .

**स्त्री चळवळीचा उद्देश :**

स्त्रीवादी चळवळीने स्त्रीला वैचारिकदृष्ट्या मुक्त करून स्वत:वर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची शक्ती तिच्यात निर्माण केली. स्त्री केवळ उपभोग्य वस्तू नाही तर तिच्यात स्वताचे अस्तित्व आहे. भावना आहे कर्तृत्व सिद्धकरण्याची क्षमता आहे. म्हणून तिला शिक्षणासोबत आर्थिक स्वातंत्र्य मिळावे सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून ती मुक्त व्हावी तिचा व्यक्तिमत्व विकास व्हावा स्वताला ओळखण्याइतपत ती सक्षम व्हावी हा स्त्रीमुक्ती चळवळीचा प्रमुख उद्देश आहे.

**भारतीय स्त्री चळवळीचा स्वातंत्र्यपूर्वीची अवस्था :**

**डॉ.** बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, तसेच राममोहन लोहिया यांच्या सारख्या विचारवंतानी स्तीयांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचारची वर्णश्रमाशी सांगड घातली.

१) १२ व्या शतकात महानुभाव पंथाच्या चक्रधर स्वामींनी स्त्रियांचे स्थान पुरुषांच्या बरीबरीने मानले होते. ‘मल्यैसा’ या त्यांच्या शिषयेच्या चरित्रावरून आणि लिखाणातून प्रचीती येते.

२) १३ व्या शतकात जनाबाईचे सामाजिक कार्य

३) १९ व्या शतकात ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, डॉ.आनंदिबाई जोशी, डॉ.रखमाबाई महात्मा फुलेंनी शेतकरी, शुद्रतीशुद्र व स्त्रिया यांच्या समस्या बाबत जातीव्यवस्था आणि पुरुषसत्ता ह्या स्त्री शोषणाच्या प्रमुख व्यवस्था आहेत असे मत प्रतिपादन सर्वात प्रथम केले .

म.गांधीनी व जयप्रकाश नारायण यांनी स्त्रियांना प्रत्यक्ष चळवळीत ओढून घेतले. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांच्या चार प्रकारच्या चळवळी अस्तित्वात होत्या १. सामाजिक सुधारणा चळवळी २. जातीविरोधी चळवळी ३. स्त्रियांच्या स्वतंत्र्य चळवळी ४. साम्यवादी समाजवादी चळवळी

१८४८ ते १९२० मध्ये सतीबंधी,विधवा पुनर्विवाह संमतीवयाचा कायदा ई. स्त्री सुधारणावादी कायदे ब्रिटीशानी हिंदुच्या कायदाचे विधीसाहिंतेत रुपांतर केले त्यातून स्त्री शिक्षणाला सुरुवात होऊन स्त्रियांच्या स्वतंत्र्य संघटना स्थापन झाल्या.

१९ व्या शतकाच्या पुर्वार्धात सुरु असलेल्या चळवळीचे स्वरूप " स्त्रीदाष्य विमोचानाचे" होते. या काळात स्त्रियांच्या प्रश्नांची जाणीव अभिव्यक्ती विचारमंथन असे या चळवळीचे स्वरूप होते. स्त्रियांच्या उन्नतीसाठी झगडणाऱ्या स्त्रिया निर्माण झाल्या.

१९२७ साली स्थापन झालेल्या अखिल महिला परिषद सुशिक्षित स्त्रियांची एक व्यापक संघटना होती. व्यक्तिस्वातंत्र्य, समानता, आणि सामाजिक अन्यायाविरुद्द आवाज उठविण्याचे काम हि संघटना करीत होती.

**स्वातंत्र्यानंतर स्त्री चळवळीची अवस्था :**

१९५०-१९७५ या काळात स्त्रियांचे स्थान कल्याणकारी भावनेतून सुधारण्याचे प्रयत्न झाले. संयुक्त महारास्त्राच्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग होता. स्त्रिया नोकरी करू लागल्या महागाईविरोधी आंदोलनात स्त्रिया सक्रीय होत्या.१९७५ हे युनोने महिला वर्ष घोषित केले. स्त्री चळवळीच्या सुरुवातीच्या काळात नेतृत्व शहरी, शिक्षित, उच्चवर्गीय-वर्णीय स्त्रीयांचेकडे असतांना स्वायत्त स्त्री संघटना आणि डाव्या विचारसरणीच्या गटांनी जतिअधरित शोषण विचारात घेतले नाही हे नमूद करावेसे वाटत या काळात मध्यमवर्गीय, सवर्ण स्त्रियांचे अनुभव आणि दलित स्त्रियांचे अनुभव हा वेगळेपणा दर्शवून स्त्रियांच्या आंदोलनाची दिशा सुद्धा एका विशिष्ट दिशेने जात आहे असे वाटते जेव्हा उच्चवर्णीय स्त्रियांच्या समस्या असेल किवा त्यांच्यावरील अत्याचाराची घटना असेल तर स्त्री आयोगापासून तर लहान शहरातील स्त्री संघटना सुद्धा त्याची दाखल घेऊन महिनो- महिने आंदोलन चालवितात, प्रशासनावर, मिडीयावर, दबाव निर्माण करतात. हजारो स्त्रिया मेणबत्ती घेऊन आंदोलन करतात. करायलाही पाहिजे परंतु एखाद्या दलित स्त्री विषयी किवा गरीब स्त्रियांविषयी कितीही क्रूरतेने काळिमा फासविणारी घटना असेल तरी सुद्धा उच्चवर्णीय स्त्री संघटनेचा आवाज अत्याचाराच्या विरोधात येताना एकू येत नाही. तेव्हा दलित स्त्री संघटना पुढाकार घेऊन आंदोलन करते परंतु सवर्ण स्त्री संघटना या आंदोलनात सामील होतांना दिसत नाही. यावरून जातीअंताच्या लढाईत स्त्री आंदोलनाची शक्ती विभागून ज्या गोष्टी आंदोलनाला अभिप्रेत आहे त्या साध्य होत नाही.

**फुले – आंबेडकरी विचारांचे स्त्री चळवळीतील योगदान :**

भारतीय परंपरेने स्त्रियांना शिक्षणापासून, स्वतंत्र विचारापासून दूर ठेवले. कर्मकांड, दैववाद, सम्पूर्ण परावलंबन तसेच तोप्काची मानसिक गुलामगिरी आणि धर्माच्या आधाराने लावलेल्या गुलामगिरीमुळे व शोषणामुळे स्त्रियांना जनावरासारखे जीवन दिले आणि म्हणूनच त्यावेळी फुले-आंबेडकरांच्या कित्येक सामाजिक सुधारणांच विचारच मुलभूत मानला जातो. एवढे असूनही स्त्रियांच्या चळवळी अजूनही विकासाच्या अवस्थेत आहे असे म्हणावे लागेल. महात्मा जोतीबा फुलेंनी पहिल्यांदा स्त्रियांचा समाजाचा एक घटक म्हणून विचार केला. मानवी जीवनातील मुलभूत हक्क स्त्रियांनाही मिळाले पाहिजेत असा त्यांचा दावा होता. महात्मा फुले म्हणतात "पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये पुरुषांनी मोधी कावेबाजी करून स्त्रियांना मानवी हक्क समजू देऊ नये म्हणून पूर्ण अज्ञानात ठेवले हे सर्व बदलले पाहिजे" हे बदलण्यासाठी स्त्री चळवळीचा जन्म झाला आहे.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS

Original Research Article

समाजातील सर्वच शोषणकर्त्याच्या विरुद्ध उठवलेला आवाज हि विरासत घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्याच व्यासपीठावर विराजमान झाले. आजच्या स्त्री चळवळीला बाबासाहेबांनी लोकशाहीचा अधिक भरभक्कम पाया दिला. हिंदूकोडबिलाने स्त्रियांवरील अनेक अत्याचारांना वाचा फोडली. सर्वात महत्वाचे म्हणजे बाबासाहेबांनी संघर्ष आणि संघटनेचा मूलमंत्र दिला. ज्यामुळेस्त्रिया स्वताच्या चळवळी उभारू शकल्या. लोकशाही पद्धतीने आंदोलने, मोर्चे ,निदर्शने, सभासंमेलने आयोजित करू लागल्या त्यांच्याच विचारांनी स्त्रीयांच्या चळवळीला तात्विक बैठक मिळाली. परंतु फुले आंबेडकर विचारांनी उभारलेली चळवळ स्वतंत्र्या पासून ते आजपर्यंत स्त्रियांना किती समजली आहे. ते आजच्या स्त्रीचळवळीच्या स्वरुपावरून कळणे सोपे आहे.

१९४८ साली मानवाच्या मुलभूत हक्कांच्या विचार “मानवी हक्काची सनद” तयार केली.आणि त्याद्वारे स्त्रियांचे स्थ्यान या विषयीचे अभ्यास करण्यासाठी विशेष समिती नेमलेली गेली.पुढे १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिलावर्ष म्हणून साजरे करण्यात आले.या वर्षात राष्ट्राराष्ट्रातील स्त्रियांच्या समस्या त्यांच्यावर होणारे अन्याय जाणून घेऊन त्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने पाऊले उचलण्याच्या प्रयत्न केला गेला. २५ -२६ ऑक्टोंबर १९८० मध्ये SNDT महिला विधापिठाने निरंतर शिक्षण योजनेअंतर्गत मोठी परिषद घेतली आणि त्यामध्ये महिलांवर होणारया अत्याचाराची चर्चा करण्यात आली. तसेच नागपूर मध्ये डॉ. रुप कुलकर्णी यांनी मोलकरीण संघटना स्थापन करून त्यांना योग्य सेवाशर्थी आणि वागणूक मिळवून देण्यासाठी लढा पुकारला. २००८ मध्ये या लढ्याला यश आले

ई.स.१९७० मध्ये स्त्रियांच्या चळवळीने व्यापक स्वरूप धारण केले. १९७५ मध्ये प्रगतशील महिला संघटन बनविले. ओरंगाबाद येथे “लीग ऑफ विमेन्स सोल्जर्स” नावाची संस्था स्थावान करून त्याद्वारे सरती स्वातंत्र्याची मागणी केली.

सन १९६० नंतर स्त्रियांची चळवळ हळूहळू संघटीत होऊ लागली.१९७५ ते १९८५ या कालावधीत स्त्रियांचे अधिकार आणि हक्काविषयी जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न झाले.या दशकात स्त्री मुक्ती चळवळीचा पाया रोवला गेला.

महिला जागृती,आणि महिला चळवलीमुळे जगातील महिलांना एका मंचावर आणून स्त्री समस्यावर गहन विचार आणि मंथन होऊ लागले. महिलांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्थितीवर वचार केला जाऊ लागला. प्रबुद्ध महिला समस्येवर लेखन करू लागल्या. साहजिकच त्याचा प्रभाव पुरुष, समाज आणि जगातील राजकीय नेत्यांवर सुद्धा पडला. स्वतंत्र्य भारतात स्त्रियांच्या चळवळीचे काही मुद्दे भिन्न झाले आहेत. त्यांना घेवून सामाजिक चळवळी उभारल्या जातात. संसदेत स्त्रीसमस्यांची जुळलेले अनेक प्रश्न उठविले जातात काही मुद्दे पूर्वीही होते परंतु आज नवीन स्वरुपात पुन्हा उफाळून येत आहे.

सन १९७९-८० च्या सुमारास ‘मथुरा बलात्कार प्रकरण’ खूप गाजले यामध्ये पोलिसांवर आरोप होता परंतु तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन पोलिसांना निर्दोष ठरविले नंतर स्त्री संघटनांनी आवाज उठवून आंदोलन तीव्र केले.मथुरा केस पुन्हा तपासण्याचे आदेश झाला. मात्र शाहाबानो प्रकरणात मात्र महिलांच्या बाजूने निर्णय असतांना सुद्धा महिला संघटनांनी रस दाखविला नाही या प्रकरणात विविध स्त्री संघटनांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. ख्रिचन समूहावर झालेल्या हल्ल्याच्या वेळेस स्त्री चळवळीचे मौन तसेच मुसलमानांच्या धर्माधिष्ठीत कायद्यावर केल्या गेलेल्या सामान्य मुसलमान स्त्री चळवळीपासून दूर जाणे यामुळे स्त्री चळवळ हि सामर्थ्यवान होण्याऐवजी कमकुवत होत जाते.

स्त्री चळवळकडून अनेक आशेचे किरण आहेत.आजच्या तरुण स्त्रिया स्त्री-पुरुष समानता गृहीत धरतात स्वातंत्र्याची आस धरतात स्त्री चळवळीचा अनेक अंगांनी त्यांना फायदा झाला आहे. सर्व स्तरातील स्त्रियांच्या विकासासाठी सत्तेतील सहभागासाठी आकांक्षा वाढल्या आहेत. लाखो स्त्रिया घराबाहेर पडून सामाजिक-राजकीय क्षेत्रात. सहभागी झाल्या आहेत. त्यांच्यात स्त्रीवादी उपक्रमाविषयी जाणीव जागृती करायला हवी तेव्हा वेगवेगळ्या ठिकाणी आणि विविध पातळीवर चाललेल्या स्त्री प्रश्ना संदर्भातले संघर्ष सोडविण्यासाठी तसेच न्याय, शांतीपूर्ण समाज स्थिरावण्यासाठी आपण सर्वांनीच हातभार लावायलाच पाहिजे.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS Original Research Article

**स्त्री चळवळी पुढील आव्हाने :**

संपूर्ण स्त्री चळवळीचा आढावा घेतल्यास असे आढळते कि बदलत्या आर्थिक,सामाजिक आणि राजकीय परीस्थितीमुळे स्त्री चळवळीमुळे फार मोठे आव्हान निर्माण झाले आहे. भारतात हिंदुत्ववादयांचा प्रभाव वाढून फासिष्ठ शक्तीचा उदय झालेला आहे त्यामुळे स्त्री चळवळीपुढे अनेक जटील प्रश्न निर्माण झाले. वरील पार्श्वभूमीचा विचार केला असता सामाजीओक चळवळीचा अभाव आणि थोड्याफार प्रमाणात थंडावलेली स्त्री चळवळ पुन्हा एकदा उभारण्याची गरज आहे कारण आता जातींचा आणि स्त्रियांचा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा होणार आहे.

समाजातील सर्व घटकातील स्त्रियांचा विकास नैतिक, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांकृतिक अशा प्रकारचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर सामाजिक अभिसरणाची चळवळ निर्माण करणे आजच्या काळाची नितांत आवश्यकता आहे. सामाजिक अभिसरण एक चळवळ आहे जिचा उद्देश लोकांच्या सहभागाने व लोकांच्या स्वप्रयत्नाने समाजाचा सर्वांगीण विकास साधने होय. हेच तत्व स्त्रियांच्या संदर्भात सुद्धा उपयोगात आणून स्त्रियांच्या सर्वांगीण विकास करणे शक्य होईल.

समाजातील बुद्धीजीवी, सुशिक्षित, प्राध्यापक, वकील, प्रशासकीय अधिकारी राजकीय पक्षांचे प्रतीनिधी, सामाजिक संघटना, कार्यकर्ते इत्यादी स्त्री व सामाजिक मंडळीनी एकत्र बसून वर्तमान सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय ,शैक्षणिक, स्थिती व अभिप्रेत परिवर्तन यावर विचारमंथन चर्चा करणे आवश्यक आहे जो पर्यंत ध्येय पूर्ती होत नाही तो पर्यंत.

स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी व रचनात्मक कार्य करणारी वरील घटकांचा सहभाग असलेली तसेच ग्रामीण भागापासून तर शहरी भागापर्यंतच्या महिलामंडळची एक-एक प्रतिनिधी घेऊन सिव्हील सोसायटी निर्माण करणे.

गांव, तालिका, पातळीवर Task force गठीत करावा जिल्हा समन्वय समिती असावी आणि हे करताना चळवळी बद्दल निष्ठा, प्रामाणिकता ,प्रतीबद्दता, समाजाबद्दलची संवेदना असणारया कृतीशील कार्यकर्त्यांचाच समावेश असावा.

**निष्कर्ष :**

भारतीय राज्यघटनेमुळे स्त्रियांना अनेक सोयी सवलती उपलब्ध आहेत. जीवनाचा सर्वच क्षेत्रात त्याचा संचार सुरु झाला आहे. परंतु खरोखरच स्त्री मुक्ती झाली काय? भारतातील स्त्री मुक्ती चळवळीला नेमके काय हवे? असे अनेक प्रश्न निर्माण होतात म्हणून स्त्री मुक्ती चळवळीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. स्त्री दुबळी नसतानाही तिच्यावर पद्धतशीरपणे संस्कार करून दुबळेपणा लादणाऱ्या समाजाशी दोन हात करणे स्त्री चळवळीला अपरिहार्य आहे. लाद्लेल्या बंधानाविरुद्ध बंडखोरी करावी लागेल. अत्याचाराविरुद्ध लढा ध्यावा लागेल. सामाजिक बंधनाची पोलादी चौकट व स्त्रीला माणूसपण नाकारणाऱ्या प्रवृत्ती विरोधात स्त्रीमुक्ती चळवळीचा लढा आहे. तेव्हा जात-पात, धर्म, वंश, प्रांत यापलीकडे जाऊन लढा ध्यावा लागेल यासाठी स्त्री जागृती अत्यंत आवश्यक आहे. स्त्रियांच्या चळवळी पुढे अनेक आव्हाने आहेत खडतर प्रवास आहे यावर मात केली तरच चळवळीचे ध्येय साध्या होईल. समाजातील सर्व घटकातील स्त्रियांचा नैतिक, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांकृतिक अशा प्रकारचा सर्वांगीण विकास साधायचा असेल समाजातील सर्व स्त्री घटकांनी जात,धर्म, वंश, गरीब-श्रीमंत,भेद विसरून काम करणे आवश्यक आहे .आणि हेच खरे आव्हान असेल

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१)काळदाते सुधा,चौधरी नारायण, 'सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी',सामाजिक व परिवर्तन : परिणाम व चळवळीचा स्थूल परिचय ,य.च. मु.वि.नाशिक, २०१२.

२) सामाजिक परिवर्तन :चिकित्सा आणि भवितव्य (भा. श.भणगे गौरव ग्रंथ ) संपादक : शरद जावडेकर,वसुधा जोशी, लता जाधव, रवींद्र मस्के.

३) मीनाक्षी मून, 'फुले आंबेडकरी स्त्री चळवळ' समता प्रकाशन,नागपूर

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I
Jan –Feb 2022

OPEN ACCESS

Original Research Article

४) डॉ. आबेडकर आणि स्त्रीमुक्ती,प्रा.प्रतिमा देसाई सावित्रीबाई प्रकाशन,चिंचवड पुणे.
५) सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र,डॉ. बी. एम. कऱ्हाडे, पिंपळपुरे प्रकाशन, नागपूर.
६) नंदिता शहा,नंदिता गांधी, स्त्री संघर्ष्याची नवी रूपे,पापुलर प्रकाशन, मुंबई.
७)स्त्री जीवनाची गुंतागुंत,विधूत भागवत,शर्मिला रेगे, वंदना पालासते,स्त्री अभ्यास केंद्र, पुणेविद्यापीठ
८) वंदना सोनाळकर, शर्मिला रेगे, 'पितृसत्ता आणि स्त्री मुक्ती' क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी
९) मंगला सामंत, 'स्त्री पर्व' सुगावा प्रकाशन
१०) अंजली मुळे,गीताली वि.म. (संम्पादक) 'स्त्री चळवळ आणि राजकारण' समतेसाठी सत्ता संघर्ष, लोकवाडमय गृह, मुंबई.

***Cite This Article:***
***डॉ.प्रशांत कांबळे*****,(2022).** *मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक या संस्थेचे शैक्षणिक योगदान: एक अभ्यास. Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XI (I), 236-241.*